Quadrant II - Notes

**Programme:** Bachelor of Arts (First Year)

**Subject:** Marathi

**Paper Title:** प्रसारमाध्यमेः लेखनकौशल्यः बातमीलेखन

**Unit:** 04

**Module Name:** बातमी लेखनाची वैशिष्ट्ये

**Module No:** 11

**Name of the Presenter:** Ms. Chaitali Chidanand Koli

---

# बातमी लेखनाची वैशिष्ट्ये

## आकाशवाणीसाठी बातमी लेखनाची वैशिष्ट्ये

१) **श्राव्य माध्यम**

आकाशवाणी हे एक श्राव्य माध्यम आहे हे लक्षात घेऊन बातम्यांचे लेखन केले जाते. त्यामुळे बातमीचे लेखन करताना काही पथ्ये पाळली जातात. जसे की भाषा साधी, सोपी व सहजसुलभ वापरली जाते, ठळक बातम्या दोन वेळा सांगितल्या जातात इ.

२) **गतिमानता**

वृत्तपत्र व दूरदर्शन यांच्या तुलनेत आकाशवाणीवरील बातम्या अधिक गतिमान असतात. आकाशवाणीइतक्या जलद गतीने व्यापक जनसमुदायासमोर कोणत्याही माध्यमातून बातमी येण्यासाठी आधी ती सुव्यवस्थित लिहावी लागते. त्यावर

संपादकीय संस्कार, संगणकीय अक्षरजुळवणी, मुद्रितशोधन, चुकीची दुरुस्ती करावी लागते मग ती बातमी वर्तमानपत्रात छापली जाते. याऊलट गतिमानता हे आकाशवाणीवरील बातम्यांचे वैशिष्ट असल्याने एखादी मोठी नैसर्गिक आपत्ती एखाद्या प्रदेशार आली असेल तर आकाशवाणीचा वार्ताहर त्यासंबंधीची ठळक माहिती संकलित करुन काही क्षणातच दूरध्वनीने ती बातमी आकाशवाणी वृत्तविभागाकडे कळवू शकतो. ती ताबडतोब वृत्त निवेदकाकडे दिली जाते आणि ती प्रसारित होते.

३) **प्रत्येक बातमीसाठी स्वतंत्र पान**

आकाशवाणीवरील प्रत्येक बातमी वेगवेगळ्या स्वतंत्र पानावर लिहिण्यात येते. बातमीचे हस्ताक्षर, मोठे व दोन ओळीत भरपूर रिकामी जागा ठेवण्याची काळजी घतली जाते. बातमी मोठी असेल तर व ती दोन- तीन पानावर लिहिली असली तर प्रत्येक पानावरचे शेवटचे वाक्य पानावर पूर्ण केले जाते, कारण पुढील वाचन करताना खंड पडण्याची शक्यता नसते.

<u>दूरचित्रवाणीसाठी बातमी लेखनाची वैशिष्ट्ये</u>

१) **दृक- श्राव्य माध्य**

दूरचित्रवाणी हे दृक- श्राव्य माध्यम आहे हे प्रथमतः लक्षात घेऊन बातम्यांची रचना केली जाते. बातम्या लिहिताना चित्र आणि ध्वनी (शब्द) यांना सारखेच महत्त्व दिले जाते. फक्त

घटनेची दृश्ये त्या घटनेबद्दल संपूर्ण माहिती देऊ शकत नाही त्यामुळे योग्य संहिता लेखन महत्वाचे आहे.

२) **विषयाला धरुन लिहिणे**

आपण दूरचित्रवाणीवरुन प्रेक्षकांशी संवाद साधत असतो याचे भान लेखकाला असते. म्हणून दूरचित्रवाणीसाठी बातम्यांचे लेखन करत असताना मोजकं, नेमकं, विषयाला धरुन लेखन केले जाते.

३) **दृश्य व लेखनात सुसंगती साधणे**

दूरचित्रवाणीसाठी लेखन करताना दृश्यं, विधानं, संदर्भासाठीचे जुने संक्षिप्त प्रसंग, कोणती दृश्यं घ्यावीत, कुणाची विधानं घ्यावीत, अधेमधे निवेधन कुठं घ्यावं याचं मनामध्ये एक 'बातमीनाट्य' आयोजित केलं जातं. तेही नाटकीपणा कुठेही येऊ न देता. दृश्य व लेखन यात सुसंगती साधली जाते.

<u>वृत्तपत्रासाठी बातमी लेखनाची वैशिष्ट्ये</u>

१) **आकर्षक मथळा-** बातमीला आकर्षक मथळा लिहिणे हे बातमी लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. एखाद्या घटनेमध्ये सर्वात महत्त्वाचे किंवा लक्ष्यवेधी जे घडले असेल त्याचा मथळा बनतो. बातमीची यशस्विता ही मथळ्यावर अवलंबून असते. अगदी थोड्या शब्दांत बातमीचा महत्त्वाचा अंश मथळ्यात यावा. शक्यतो चार- पाच शब्दांपेक्षा त्याची लांबी अधिक असू नये.

४) **ताजेपणा-** बातमी लेखनात ताजेपणा असायला हवा. बातमी शिळी असू नये. सकाळी- सकाळी वर्तमानपत्र उघडून ज्या बातम्या आपण वाचतो त्या नव्या असतात म्हणजेच त्या बातमीत ताजेपणा असतो. ताजेपणा हे बातमी लेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

५) **पूर्वसंदर्भ-** प्रत्येक बातमीच्या अंतरंगात त्या घटनेची पार्श्वभूमी आणि तपशील दिला तर बातमी परिपूर्ण रीतीने समजते आणि वाचकांच्या मनात तिच्या माहितीविषयी कोणतेही प्रश्नचिन्ह राहात नाही. काही वाचक काही कारणांमुळे मधल्या काळातील वृत्तपत्रांचे अंक त्यांनी वाचलेले नसतात. त्यामुळे एखाद्या घटनेचा पूर्वसंदर्भ त्यांना माहित नसतो. शिवाय बहुसंख्य वाचक सहजपणे वृत्तपत्र वाचतात. अशा वाचकांसाठी बातमीत पूर्वसंदर्भ द्यावा लागतो व सर्व घटनांची पुन्हा नोंद करावी लागते. त्यामुळे पूर्वसंदर्भ देणे हेसुध्दा बातमी लेखनाचे वैशिष्ट्य आहे.

६) **अतिरिक्त माहिती-** बातमीमध्ये मूळ आशयाच्या पुष्टीकरणार्थ ताज्या घडामोडींनुसार काही तपशील असल्यास तो बातमीच्या शेवटी जोडला जातो आणि त्याबद्दल माहिती दिली जाते.

७) **आकडेवारी -** बातमीच्या तपशिलासंदर्भात काही आकडेवारी असल्यास ती टेबलच्या साहाय्याने सर्वसामान्य वाचकाला कळेल अशा स्वरुपात दिली जाते. उदाहरणार्थ- स्पर्धेचे वेळापत्रक, गुणवत्ता इ.

८) **अर्थपूर्ण शब्दांचा वापर-** नेमके सुबोध आणि अर्थपूर्ण शब्दांचा वापर बातमी लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वर्तमानपत्रातील मोजकी

जागा आणि अत्यंत थोडा वेळ याकडे लक्ष ठेवून बातमी लिहिली पाहिजे. बातमीत तपशील असावा पण पाल्हाळीकता असता कामा नये. विचारपूर्वक शब्दयोजना केल्यास अकारण येणारे पाल्हाळ टाळता येते आणि लेखनाला नेमकेपणा येतो.

९) **सहा 'क' करांची उत्तरे-** बातमी लेखनात सहा 'क' करांची उत्तरे देणे हे बातमी लेखनाचे वैशिष्ट्य आहे. सहा 'क' कार म्हणजे कुठे, कोणी, केव्हा, कसे, का, कोणत्या.

<u>वृत्तपत्र, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी साठी बातमी लेखनाची वैशिष्ट्ये</u>

१) **परिणामकारकता-** बातमीचा समाजमनावर व्यापक परिणाम होतो. नकारात्मक बातम्यांचा नकारात्मक परिणाम होतो तर सकारात्मक बातम्यांचा सकारात्मक परिणाम होतो त्यामुळे परिणामकारकता हेदेखील बातमी लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

२) **साधी सोपी भाषा-** बातमी ही सामान्य जनतेसाठी असल्यामुळे ती सर्वांना समजेल अशा पध्दतीने तिचे लेखन करणे आवश्यक असते. साध्या आणि सोप्या भाषेत अचूक बातमी तयार करणे महत्त्वाचे. संस्कृतप्रचुर शैलीतील, भारदस्त शब्दांचा वापर असलेली बातमी ही समाजातील केवळ उच्चभ्रू माणसांपुरतीच मर्यादित राहाते. सर्वसामान्यांपर्यंत ती पोहोचत नाही. बातमीची

भाषा सहज समजण्याइतकी सोपी असावी. त्यामधील वाक्ये लहान आणि शब्दही सोपे व सुपरिचित असावेत.

३) **बातमी लेखनाचे नियम-** बातमी ही लेखनविषयक नियम लक्षात ठेऊन लिहिली जाते.

४) **वस्तूनिष्ठता-** वस्तूनिष्ठपणे बातमी लिहिणे हे बातमी लेखनाचे वैशिष्ट्य आहे. घटनेचे वृत्त जसे घडले तसे बातमीत द्यावे त्यात आपल्या पदरचे अथवा आपली मते, घुसडू नयेत. बातमी ही वस्तुनिष्ठ असते. वार्ताहराच्या, बातमी - लेखकाच्या व्यक्तिगत अभिव्यक्तीला येथे मुळीच वाव नसतो.